# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद

MCAER कृषि परिषद

MCAER कृषि परिषद २००८-२००९

१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७

ई-मेल : mcaermaurb@gmail.com दूरध्वनी : (०२०) २५५३ ७२५७

वेबसाईट : www.mcaer.org


जा.क्र. मकृप/मकृसेमं/ ९७२ /२०१९ दिनांक : 17 MAY 2019

## कार्यालयीन आदेश

**वाचा** :- कृषी परिषद, पुणे ९८ वी बैठक विषय क्र.३५, ठराव क्र.३२/९८/२०१९
दि. ०७.०३.२०१९

**प्रस्तावना :** महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग आठ, असाधारण क्र. ८९, दि. २४.१२.२०१३ अन्वये राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतील प्राध्यापक व त्यावरील उच्च संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत कार्यवाही करणेसाठी शासनाने 'महाराष्ट्र कृषी विद्यापीठे सेवा प्रवेश मंडळाची' स्थापना झाली आहे. सेवा प्रवेश मंडळामार्फत पदोन्नती व सरळसेवा भरती प्रक्रिया राबविली जाते तसेच कॅस (टप्पा क्र. ४ ते टप्पा क्र. ५ आणि टप्पा क्र. ५ ते टप्पा क्र. ६ ) लागु केले जातात.

या प्रक्रियेमध्ये ज्या प्राध्यापकांवर अन्याय झाल्याची भावना निर्माण होते ते थेट न्यायालयामध्ये जातात तसेच ज्या प्राध्यापकांना मुलाखतीसाठी अथवा पदोन्नतीसाठी अपात्र ठरविले जाते त्यांच्यापैकी काही प्राध्यापक थेट न्यायालयात याचिका दाखल करतात त्यामुळे भरतीप्रक्रिया लांबली जाते.

महाराष्ट्र कृषी विद्यापीठे परिनियम, १९९० मधील परिनियम-११८ नुसार कृषी विद्यापीठे येथे स्वतंत्र तक्रार निवारण समिती कार्यरत आहे. त्यास अनुसरून तक्रारींचे निवारण करण्यासाठी कृषी परिषद स्तरावरही या स्वरूपाची स्वतंत्र तक्रार निवारण समिती गठित करण्यासाठी दि.०७.०३.२०१९ रोजी झालेल्या कृषी परिषदेच्या ९८ व्या बैठकीत ठराव पारित करण्यात आला.

सदर ठरावाच्या अनुषंगाने कृषी परिषद स्तरावर खालील प्रमाणे तक्रार निवारण समिती गठित करण्यात येत आहे.

## तक्रार निवारण समिती

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अध्यक्ष | : | अध्यक्ष, महाराष्ट्र कृषी विद्यापीठे सेवा प्रवेश मंडळ |
| २ | सदस्य | : | महाराष्ट्र कृषी विद्यापीठे सेवा प्रवेश मंडळावर असलेले मा. राज्यपाल नियुक्त सदस्यांपैकी एक सदस्य |
| ३ | सदस्य | : | संबंधित विद्यापीठाचे कुलगुरू |
| ४ | सदस्य सचिव | : | सदस्य सचिव, कृषी परिषद तथा सचिव, सेवा प्रवेश मंडळ |

उक्त समिती प्राध्यापक व त्यावरील उच्च संवर्गातील भरती प्रक्रिया (सरळसेवा, पदोन्नती, कॅस) याबाबतच्या तक्रारींचे निवारण करेल.

**(महेन्द्र ब. वारभुवन, भाप्रसे)**
महासंचालक
कृषी परिषद, पुणे